दै. केसरी

मंगळवार, २३ जुलै २०१९

सोशल मीडिया मार्केटिंगमध्ये व्यवसाय संधी : मनोज कोटक

कोल्हापूर : प्रतिनिधी

सोशल मीडिया हे एकाचवेळी लाखो लोकांपर्यंत पोहोचण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे. त्यामुळे सोशल मीडियाचा वापर सदुपयोगासाठी करणे गरजेचे आहे. सोशल मीडिया मार्केटिंगमध्ये व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा, असे प्रतिपादन इमेज ऑनलाईन प्रा. लि. मुंबईचे संचालक मनोज कोटक यांनी केले.

ते विवेकानंद कॉलेजमधील बी. व्होक. आणि कम्युनिटी कॉलेजच्या वतीने आयोजित सोशल मीडिया मार्केटिंग या विषयावरील एकदिवसीय चर्चासत्रात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कला आणि वाणिज्य विभागाच्या अधीष्ठाता डॉ. श्रुती जोशी होत्या.

विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित सोशल मीडिया मार्केटिंग या विषयावरील एकदिवसीय चर्चासत्रात डॉ. श्रुती जोशी यांनी मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. श्रुती जोशी म्हणाल्या, आपण सोशल मीडियाच्या सहाय्याने आपले विचार जगभर पोहोचवू शकतो. याच सोशल मीडियामुळे विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता वाढीस लागली आहे.

प्रास्ताविक व स्वागत प्रा. राहुल इंगवले यांनी केले. आभार प्रा. पूजा कांबळे यांनी मानले.

सूत्रसंचालन प्रा. सतीश उपळावीकर व प्रा. श्रध्दा शिंदे यांनी केले.

या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर आणि बी. व्होक. कम्युनिटी कॉलेजचे समन्वयक प्रा. सतीश गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमास प्रा. संग्राम देसाई, प्रा. अक्षय खोत, प्रा. आनंदा सावंत, प्रा. रविराज सुतार, प्रा. सिध्दांत कर्णिक, प्रा. अभिजित माने, प्रा डॉ. प्रदीप पाटील आणि विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकमत कोल्हापूर, मंगळवार, दि. २३ जुलै २०१९

प्रभावती पाटील : विवेकानंद महाविद्यालय येथे वाचनकट्ट्याचे उद्घाटन

वाचन संस्कृतीने सक्षम विद्यार्थी घडतील

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : वाचनमूल्ये रुजावीत यासाठी विविध भाषेतील विविध पुस्तकांचे वाचन विद्यार्थ्यांनी करावे. वाचनसंस्कृती वाढविणे ही काळाची गरज बनली आहे. उत्तम वाचक हाच उत्तम वक्ता होऊ शकतो; त्यासाठी वाचनकट्टा कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण केली पाहिजे. ही आवड विद्यार्थ्यांना ज्ञानी बनवून जीवन जगण्याचे बळ देईल, असे विचार महाविद्यालयाच्या वाङ्मय मंडळाच्या प्रमुख प्रा. डॉ. प्रभावती पाटील यांनी व्यक्त केले.

विवेकानंद कॉलेजच्या वाङ्मय मंडळाच्या वतीने शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे समाधी परिसरात आयोजित वाचनकट्टा उद्घाटन समारंभात बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख प्रा. बी. के. गोसावी होते.

विवेकानंद कॉलेजच्या वाङ्मय मंडळाच्या वतीने शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे समाधी परिसरात आयोजित वाचनकट्टा उद्घाटन समारंभात सहभागी विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि प्राध्यापक.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रा. बी. के. गोसावी म्हणाले की, आजच्या जगात ज्ञानाच्या क्षेत्रात झपाट्याने वाढ होत आहे. नवनवीन साहित्यकृतींमुळे भाषा समृद्ध होत आहे. दर्जेदार वाचनाने आपली ज्ञानसंस्कृती जोपासता येईल व भाषा आणि संस्कृती समृद्ध होईल. संगणक व मोबाईलच्या जगात वाचनाची सवय दिवसेंदिवस कमी होत चालली आहे; त्यामुळे केवळ शिक्षणापुरतेच वाचन म्हणजे ज्ञान नव्हे; त्यासाठी आपल्या समाजातील प्रसिद्ध लेखकांच्या प्रसिद्ध रचनांचे वाचन केले पाहिजे. तरच वाचनसंस्कृतीचा विकास साधला जाईल.

यावेळी प्रा. समिक्षा फराकटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. प्रदीप पाटील यांनी केले. आभार प्रा. डॉ. शर्मिला घाटगे यांनी मानले. याप्रसंगी विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

महाराष्ट्र टाइम्स

मंगळवार, २३ जुलै २०१९

अभयकुमार साळुंखे यांना पुरस्कार

कोल्हापूर टाइम्स टीम

'साहित्यसंपदा' मार्फत आयोजित केलेल्या राज्यस्तरीय साहित्य संमेलनात विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या मान्यवरांना पुरस्काराने गौरविले जाणार आहे. विविध क्षेत्रातील १५ व्यक्तींची निवड पुरस्कारांसाठी केली आहे. कोल्हापुरात २८ जुलै रोजी हे संमेलन होणार आहे, अशी माहिती संमेलनाचे प्रवक्ते वैभव चौगुले यांनी दिली.

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांना समाजरत्न यांच्यासह मगनलाल रजपूत, जितेंद्र बजाज, ज्येष्ठ गझलकार ए. के. शेख, डॉ. कुमार ननावरे (मी सरकारी डॉक्टर), आप्पासाहेब जकाते-यादव (खुरपं दोरी), सुजय देसाई (शंभुजागर), ऋचा वाघमारे (कळ्या पाकळ्या), हेमंत नेहते, (मुलांसाठी प्रभावी भाषणे), संदीप बोडके, (उजळली सांजवेळ) दत्ता पाटील, डॉ. शिव कुमार पवार, सर्पमित्र मंगेश अंमलदार, संभाजी चौगले, निसर्ग मित्र अवधूत पाटील यांना पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत.

कोल्हापूर TIMES

महाराष्ट्र टाइम्स

सशक्त विद्यार्थी नेतृत्व

'मटा राउंड टेबल'मध्ये प्राचार्य, विद्यार्थी संघटनांच्या प्रतिनि

कोल्हापूर टाइम्स टीम

जवळपास २७ वर्षांनी महाविद्यालयांच्या आवारात विद्यार्थी प्रतिनिधी निवडणुकांचा गजर ३० सप्टेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. विद्यार्थी संघटनांची मागणी, विद्यार्थ्यांमध्ये असलेली उत्सुकता आणि कॉलेजांच्या स्तरावर व्यवस्थापन यंत्रणा राबवण्याची तयारी यामुळे यंदापासून विद्यार्थी निवडणूक होणार आहे. निवडणूक रिंगणात उतरणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उत्साहाचा वारू सांभाळणे, ईर्षेतून कोणतीही चुकीची गोष्ट घडू न देता पारदर्शी व निकोप वातावरणात निवणुकीची बोट किनाऱ्यावर लावणे यांसारख्या जबाबदाऱ्या कॉलेज व पर्यायाने प्राचार्यांसह प्राध्यापकांवर आहेत. विद्यापीठ कायद्यानुसार व निवडणूक नियमावलीनुसार राजकीय संघटना, राजकीय पक्षांशी बांधील विद्यार्थी संघटनांना निवडणुकीत थेट सहभाग घेता येणार नसल्याचे बंधन आहे. या पार्श्वभूमीवर 'मटा'च्यावतीने आयोजित 'राउंड टेबल'मध्ये शहरातील प्रमुख कॉलेजांचे प्राचार्य व विद्यार्थी संघटनांनी विद्यार्थी प्रतिनिधी निवडणुकीच्या निर्णयाचे स्वागत केले. विद्यार्थी दशेत आकाराला येणारे नेतृत्व, भविष्यात समाजासाठी वैचारिक व अभ्यासू नेत्यांची गरज पाहता विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक ही चांगली संधी असल्याचा समान मतप्रवाह व्यक्त झाला.

मटा राउंड .टेबल

अमित गद्रे

यंदाच्या विद्यार्थी प्रतिनिधी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'मटा'तर्फे राउंड टेबल चर्चा झाली. यावेळी सहभागी डावीकडून पार्थ मुंडे, आरती रेडेकर, धीरज कठारे, मंदार पाटील, डॉ. एस. वाय. होनगेकर, डॉ. सुरेश गवळी, डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. आर. पी. लोखंडे, प्रा. एस. आर. घाटगे, जयराज घोटवडे, मंजित माने.

निरोगी लोकशाही रुजवण्यावर भर

विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक प्रक्रियेसाठी राज्य सरकारने विद्यापीठ प्रशासनाला आचारसंहिता घालून दिली आहे. विद्यापीठाने दिलेल्या सूचनांच्या आधारे विद्यार्थी प्रतिनिधी निवडणुकीची जबाबदारी प्राचार्य व प्राध्यापकांवरच आहे. आचारसंहितेचे काटेकोर पालन करूनच निवडणुकीचा कार्यक्रम निश्चित केला जाणार आहे. कोणत्याही पक्षाचा राजकीय झेंडा विद्यार्थी निवडणुकीच्या माध्यमातून कॅम्पसमध्ये येणार नाही यासाठी कॉलेज प्रशासन दक्ष राहणार आहे. निवडणूक शांतपणे यशस्वी करण्याच्या प्रक्रियेत विद्यार्थ्यांचा सहभागही तितकाच महत्त्वाचा आहे. निरोगी लोकशाही रुजवण्यावर भर देणारी ही संधी आहे.

- डॉ. एस. वाय. होनगेकर,
प्राचार्य, विवेकानंद कॉलेज

पुढारी कोल्हापूर, मंगळवार, २३ जुलै २०१९

मुक्त विद्यापीठाच्या आधारामुळे अनेक विद्यार्थी प्रशासकीय सेवेत

डॉ. अर्जुन घाटुळे; पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ

कोल्हापूर : प्रतिनिधी

महिला, नोकरदार, शेतकरी, दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मुक्त विद्यापीठाचा मोठा आधार आहे. मुक्त विद्यापीठातून शिक्षण पूर्ण केल्यामुळे अनेक विद्यार्थी प्रशासकीय सेवेत अधिकारी झाले आहेत, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक डॉ. अर्जुन घाटुळे यांनी केले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, विभागीय केंद्र कोल्हापूरतर्फे विवेकानंद महाविद्यालयात आयोजित पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. याप्रसंगी पत्रकार ग. गो. जाधव चॅरिटेबल ट्रस्ट संचलित वृत्तपत्र पदविका, पदवी अभ्यासक्रमाच्या ३० विद्यार्थांनी पदवी प्रमाणपत्र स्वीकारली.

डॉ. घाटुळे म्हणाले, मुक्त विद्यापीठांतर्गत लाखो विद्यार्थी राज्यात शिक्षण घेतात. याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना करिअरच्या नवनवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत. कोल्हापूर विभागीय संचालक प्रा. दादासाहेब मोरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. कविता तिवडे यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. एस.वाय.होनगेकर यांनी आभार मानले.

कोल्हापूर : पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभात बोलताना परीक्षा नियंत्रक डॉ. अर्जुन घाटुळे. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्रा. दादासाहेब मोरे आदी. (छाया : नाज ट्रेनर)

८ हजार ८९० स्नातकांना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण

कोल्हापूर व सांगली येथील सुमारे ८ हजार ८९० स्नातकांना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यासाठी १५ हून अधिक स्टॉल लावण्यात आले होते. पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी महिला, विद्यार्थी, विद्यार्थिनी यांची गर्दी झाली होती. पदवी प्रमाणपत्र घेतल्यानंतर विद्यार्थांनी ग्रुप फोटोबरोबर सेल्फी काढून सोशल मीडियावर अपलोड केले.